२४५

एकाच प्रकरणात गुंतलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द संयुक्त विभागीय चौकशीची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
परिपत्रक क्रमांक- डीईएन १००६/प्र.क्र.८२१ /आस्था-१२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,दिनांक २८ सप्टेंबर,२००६.

वाचा : १) ग्राम विकास विभागाचे परिपत्रक,क्रमांक-डीईएन १०८६/१६९१/२०, दिनांक २५ जुलै, १९८६.
२) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक-सीडीआर १०८९/प्र.क्र.१३/९०/११ दिनांक ८ फेब्रुवारी, १९९३.

**परिपत्रक :**

जेंव्हा एखादया अपहाराच्या प्रकरणात शासनाचे राजपत्रित अधिकारी व जिल्हा परिषदेचे वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी गुंतलेले असतात, तेव्हा अशा प्रकरणी संयुक्त चौकशी करण्यात यावी व एकत्रितपणे गुंतलेल्या व्यक्तीपैकी सर्वात जेष्ठ अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यास जो अधिकारी सक्षम असतो अशाच अधिका-याकडे सर्व व्यक्तीविरुध्दची विभागीय चौकशी सोपविण्यात यावी अशा सूचना ग्राम विकास विभागाने संदर्भाधीन क्रमांक-१ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या आहेत.

२. संदर्भाधीन क्रमांक २ च्या शासन निर्णया अन्वये सामान्य प्रशासन विभागाने देखील उपरोक्तप्रमाणे सूचना देऊन जिल्हा परिषदेमध्ये निर्माण झालेल्या प्रकरणांच्याबाबतीत दोषारोप पत्र तयार करुन ते संबंधित शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याकडे विनाविलंब पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सोपविलेली आहे.

३. तथापि,जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या पुनरिक्षण अर्जावर घेतलेल्या सुनावणी दरम्यान शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकांचे काटेकोरपणे पालन होत नाही. त्यामुळे एकाच प्रकरणातील वरिष्ठ अधिकारी निर्दोष सुटतात व जिल्हा परिषद कर्मचा-यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कार्यवाही होते. सबब, याव्दारे पुन्हा सूचित करण्यात येते की, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. वरील सूचनाप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा **संगणक सांकेतांक २००६०९२८१७०२४९००१ असा आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

के. एस. वत्स

( के.एस. वत्स )
सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत,
१. विभागीय आयुक्त,(सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,(सर्व)
३. कार्यासन क्र.आस्था-२,आस्था-३ व आस्था-४,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४. निवड नस्ती , आस्था-१२, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

Paripartak 17.9. MSK

S. O. file

आवक-२३४
दि. १६/१०/०६

२६